RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

**वर्ष १२, अंक २९]** **शुक्रवार, मे १५, २०२६/वैशाख २५, शके १९४८** **[पृष्ठे ११, किंमत : रुपये १६.००**

**असाधारण क्रमांक ५६**

### प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील**
**(भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त)**
**अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मे २०२६

### अधिसूचना

**औद्योगिक संबंध संहिता, २०२०.**

क्र. आयटीआर १२२४/प्र.क्र.१३५/कामगार ६.— औद्योगिक संबंध संहिता, २०२० (२०२० चा ३५) च्या कलम ४४ च्या पोट-कलम (५) तसेच कलम ९९ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि महाराष्ट्र कामगार न्यायालये व औद्योगिक न्यायालये यांचे न्यायिक अधिकारी (सेवाप्रवेश, नियुक्ती आणि शिस्तभंगाची कारवाई) नियम, २०१४ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन, प्रस्तावित केलेल्या नियमांचे पुढील प्रारूप, त्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, उक्त संहितेच्या कलम ९९ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करीत आहे ; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, ज्या दिनांकास ही अधिसूचना, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल त्या दिनांकापासून ४५ दिवस समाप्त झाल्यानंतर, महाराष्ट्र शासनाद्वारे उक्त प्रारूप नियम विचारात घेण्यात येतील.

**२.** उपरोक्त कालावधी समाप्त होण्यापूर्वी, उक्त प्रारूप नियमांच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संघटनेकडून, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना किंवा mh.labourcodes.rules@gmail.com या ईमेलवर जे प्राप्त होतील असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना, शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**३.** आक्षेप आणि सूचना पुढील नमुन्यात खालील बाबींचा समावेश करून पाठवाव्यात :—

(क) स्तंभ (एक) मध्ये व्यक्तीचे किंवा संघटनेचे नाव व पत्ता;

(ख) स्तंभ (दोन) मध्ये ज्या नियमात किंवा पोट-नियमात फेरबदल प्रस्तावित केले आहेत तो नियम किंवा पोट-नियम; आणि

(ग) स्तंभ (तीन) मध्ये बदली दाखल करण्याचे प्रस्तावित केलेला सुधारित नियम किंवा पोट-नियम आणि त्याची कारणे.

## प्रारूप नियम

## प्रकरण-एक

## प्रारंभिक

१. या नियमांस, महाराष्ट्र औद्योगिक न्यायाधिकरण नियम, २०२६, असे म्हणावे.

२. व्याख्या.- (१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "संहिता" याचा अर्थ, औद्योगिक संबंध संहिता, २०२० (२०२० चा ३५), असा आहे;

(ख) "जिल्हा न्यायाधीश" याचा भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २३६ मध्ये तरतूद केलेल्या अर्थाप्रमाणे अर्थ असेल;

(ग) "इलेक्ट्रॉनिकरीत्या" याचा अर्थ, संहितेच्या प्रयोजनासाठी, ईमेलद्वारे किंवा नियुक्त केलेल्या पोर्टलवर अपलोड करून सादर केलेली कोणतीही माहिती किंवा कोणत्याही डिजिटल पद्धतीने केलेले प्रदान, असा आहे;

(घ) "उच्च न्यायालय" याचा अर्थ, मुंबई येथील उच्च न्यायालय, असा आहे;

(ङ) "कलम" याचा अर्थ, संहितेचे कलम, असा आहे;

(च) "शोध-नि-निवड समिती" याचा अर्थ, नियम ३ अनुसार घटित केलेली शोध-नि-निवड समिती, असा आहे;

(छ) "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ज) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, संहितेअन्वये घटित केलेले औद्योगिक न्यायाधिकरण, असा आहे.

(२) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संहितेमध्ये जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल.

## प्रकरण-दोन

## न्यायाधिकरणाच्या सदस्यांची नियुक्ती

३. **न्यायाधिकरणाच्या न्यायिक सदस्याची नियुक्ती.—** (१) न्यायिक सदस्याची नियुक्ती, शोध-नि-निवड समितीच्या शिफारशीवरून, उच्च न्यायालयाशी विचारविनियम करून राज्यपालाकडून करण्यात येईल.

(२) **नियुक्तीची पद्धत**.— न्यायिक सदस्य पदावरील नियुक्ती पुढील पद्धतींनी करण्यात येईल :—

(क) नामनिर्देशनाद्वारे, किंवा

(ख) बदलीद्वारे.

(३) **नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती.—** जी व्यक्ती,—

(एक) मुंबई उच्च न्यायालयाची न्यायाधीश राहिलेली आहे ; किंवा

(दोन) तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी जिल्हा न्यायाधीश किंवा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश राहिलेली आहे; किंवा

(तीन) पाच वर्षांहून कमी अनुभव नसलेला दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) म्हणून राहिलेला, ज्यामध्ये कामगार न्यायालयातील न्यायाधीश या पदाच्या अनुभवाचा समावेश असू शकेल; किंवा

(चार) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) अन्वये घटित केलेल्या औद्योगिक न्यायालयाचा पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी सदस्य राहिलेली आहे; किंवा

(पाच) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) अन्वये घटित केलेल्या कामगार न्यायालयाचा पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी न्यायाधीश राहिलेली आहे,

ती व्यक्ती, न्यायिक सदस्य म्हणून नियुक्तीसाठी पात्र असेल :

परंतु, जोपर्यंत राज्य शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाद्वारे वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याचे घोषित केले जात नाही, तोपर्यंत कोणत्याही व्यक्तीची नामनिर्देशनाद्वारे न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

(४) **बदलीद्वारे नियुक्ती.—**औद्योगिक न्यायाधिकरणाच्या न्यायिक सदस्य पदावरील नियुक्ती ही मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीश किंवा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश किंवा औद्योगिक न्यायालयाचा विद्यमान अध्यक्ष अथवा सदस्य यांच्या संवर्गातून किंवा कामगार न्यायालयाचा न्यायाधीश यांच्या बदलीद्वारे करण्यात येईल.

**४. न्यायाधिकरणाच्या प्रशासकीय सदस्याची नियुक्ती.—** (१) प्रशासकीय सदस्याची नियुक्ती ही, शोध-नि-निवड समितीच्या शिफारशीवरून नामनिर्देशनाने राज्य शासनाद्वारे करण्यात येईल.

(२) जी व्यक्ती,—

(एक) महाराष्ट्र शासनाच्या भारतीय प्रशासकीय सेवेत सदस्य राहिलेली आहे; किंवा

(दोन) महाराष्ट्र शासनामध्ये सहसचिव किंवा उपसचिव किंवा अवर सचिव आहे किंवा राहिलेली आहे, ज्यांची शासकीय सेवा दहा वर्षांपेक्षा कमी नाही तसेच जिला प्राधान्याने कामगार विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव आहे किंवा कामगार कायद्यातील पदविका अथवा कायद्याची पदवी धारक आहे; किंवा

(तीन) महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागात कामगार आयुक्त आहे किंवा राहिलेली आहे, जिला कामगार विषयक बाबी हाताळण्याचा पुरेसा अनुभव आहे; किंवा

(चार) महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागात अपर किंवा उप किंवा सहायक कामगार आयुक्त आहे किंवा राहिलेली आहे, ज्यांची शासकीय सेवा दहा वर्षांपेक्षा कमी नाही तसेच जिला कामगार विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव आहे; किंवा

(पाच) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे सहसंचालक किंवा बाष्पके संचालनालयाचे सहसंचालक आहे किंवा राहिलेली आहे, ज्यांची शासकीय सेवा दहा वर्षांपेक्षा कमी नाही.

ती व्यक्ती प्रशासकीय सदस्य म्हणून नियुक्तीसाठी पात्र असेल.

(३) राज्य शासनाने या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाद्वारे वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याचे घोषित केले जात नाही, तोपर्यंत कोणत्याही व्यक्तीची प्रशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

**५. शोध-नि-निवड समिती.—**

(१) औद्योगिक न्यायाधिकरणाच्या सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी एक शोध-नि-निवड समिती असेल, ज्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल,—

(क) मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश - अध्यक्ष;

(ख) अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र शासन - सदस्य;

(ग) प्रधान सचिव आणि विधि परामर्शी किंवा सचिव, विधि आणि न्याय विभाग, महाराष्ट्र शासन - सदस्य;

(घ) कामगार आयुक्त, कामगार विभाग - सदस्य-सचिव.

(२) शोध-नि-निवड समिती आपली कार्यपद्धती निश्चित करील आणि यथास्थिति, न्यायिक किंवा प्रशासकीय सदस्याच्या पदावर, नियुक्ती करण्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तींची अर्हता, योग्यता, मागील कामगिरीची नोंद, सचोटी तसेच अभिनिर्णयाचा अनुभव विचारात घेऊन, औद्योगिक न्यायाधिकरणाची आवश्यकता लक्षात घेऊन, योग्य वाटेल अशा दोन किंवा तीन व्यक्तींच्या नामिकेची शिफारस करील.

(३) न्यायाधिकरणाच्या सदस्याची कोणतीही नियुक्ती केवळ शोध-नि-निवड समितीतील कोणत्याही सदस्याचे पद रिक्त असल्यामुळे किंवा अनुपस्थितीमुळे अवैध ठरणार नाही.

## प्रकरण-तीन

## न्यायाधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी, रजा व वेतन आणि भत्ते

६. **पदावधी.**— न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, तिने पदभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून चार वर्षांच्या कालावधीसाठी किंवा वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत, पद धारण करील.

७. **नैमित्तिक रिक्त पद.**— न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्याच्या कार्यालयात नैमित्तिक रिक्त पद असल्यास, राज्य शासन अनुक्रमे न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून पदावर स्थानापन्न होण्यासाठी अन्य औद्योगिक न्यायाधिकरणाच्या कोणत्याही न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्याची नियुक्ती करील.

८. **वेतन व भत्ते.**—

(क) न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य, त्यांच्या मूळ संवर्गाला अनुज्ञेय असलेले वेतन व भत्त्यास हक्कदार असतील.

(ख) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त सदस्याला वेतन व भत्ते.- सेवानिवृत्त किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त व्यक्तींमधून नियुक्त केलेले न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ नुसार किंवा यथास्थिति, शासनाकडून वेळोवेळी निर्धारित केल्याप्रमाणे, त्यांनी आहरित केलेले अंतिम वेतन आणि इतर अनुज्ञेय भत्ते याच्या इतके वेतन आणि भत्ते मिळण्यास हक्कदार असतील.

९. **रजा.**— (क) न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य त्यांच्या मूळ संवर्गाला अनुज्ञेय असल्याप्रमाणे रजेसाठी हक्कदार असतील.

(ख) सेवानिवृत्त किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त व्यक्तींमधून नियुक्त झालेले न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य, राज्य शासनाच्या समान वेतन असलेल्या गट 'अ' पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या रजेस हक्कदार असतील.

(ग) राज्य शासन हे, प्रशासकीय सदस्यासाठी रजा मंजूर करणारे प्राधिकरण असेल.

(घ) उच्च न्यायालय हे, न्यायिक सदस्यासाठी रजा मंजूर करणारे प्राधिकरण असेल.

(ङ) राज्य शासन हे, न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्याच्या परदेश प्रवासासाठी मंजुरी देणारे प्राधिकरण असेल.

## प्रकरण-चार

## संकीर्ण

१०. **पद ग्रहण आणि गोपनीयतेची शपथ.**— न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून नियुक्त झालेली प्रत्येक व्यक्ती, आपले पद ग्रहण करण्यापूर्वी, या नियमांना जोडलेल्या नमुना-१ मधील पद ग्रहण आणि गोपनीयतेची शपथ घेईल आणि त्यावर स्वाक्षरी करील.

११. **न्यायाधिकरणाच्या सदस्याची वर्तणूक.**— (क) जर राज्य शासनाकडे न्यायाधिकरणाचा न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्याच्या विरुद्ध गैरवर्तन किंवा सदस्य म्हणून कार्ये पार पाडण्यास अक्षम असल्याचा कोणताही निश्चित आरोप असलेली लेखी आणि पडताळणी करण्यायोग्य तक्रार प्राप्त झाली, तर शासन अशा तक्रारीची प्राथमिक छाननी करील.

(ख) जर प्राथमिक छाननीवरून, राज्य शासनाचे असे मत असेल की, संबंधित सदस्याच्या कोणत्याही गैरवर्तन किंवा असमर्थतेच्या सत्यतेची चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे असतील, तर ते चौकशी करण्यासाठी शोध-नि-निवड समितीकडे विचारार्थ पाठवील.

(ग) शोध-नि-निवड समिती सहा महिन्यांच्या कालावधीत किंवा राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या पुढील कालावधीत चौकशी पूर्ण करील.

(घ) चौकशी पूर्ण झाल्यानंतर, शोध-नि-निवड समिती आपला अहवाल राज्य शासनास सादर करील, ज्यामध्ये तिचे निष्कर्ष आणि प्रत्येक आरोपावरील कारणे स्वतंत्रपणे नमूद केलेली असतील आणि संपूर्ण प्रकरणावर तिला योग्य वाटतील अशी निरीक्षणे नोंदवलेली असतील.

(ङ) शोध-नि-निवड समिती दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) द्वारे निर्धारित केलेल्या प्रक्रियेला बांधील नसेल, परंतु ती नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार कार्य करील आणि तिला चौकशीचा दिनांक, ठिकाण आणि वेळ निश्चित करण्यासह आपली स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याचा अधिकार असेल.

**१२. सदस्याला पदावरून दूर करणे.—** (१) राज्य शासन, शोध-नि-निवड समितीच्या शिफारशीनुसार, कोणत्याही न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्याला पदावरून दूर करील, ज्याला,—

(क) नादार म्हणून घोषित करण्यात आले असेल ; किंवा

(ख) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधासाठी सिद्धापराध ठरवलेले असेल ; किंवा

(ग) असा न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून काम करण्यास शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या असमर्थ ठरला असेल; किंवा

(घ) ज्याने असे वित्तीय किंवा इतर हितसंबंध संपादन केले असतील की, ज्यामुळे न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून त्याच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असेल; किंवा

(ङ) ज्याने आपल्या पदाचा असा दुरुपयोग केला असेल की, ज्यामुळे त्याचे पदावर राहणे सार्वजनिक हितासाठी बाधक ठरेलः

परंतु, जेव्हा खंड (क) ते (ङ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणास्तव एखाद्या न्यायिक सदस्याला किंवा प्रशासकीय सदस्याला पदावरून दूर करण्याचा प्रस्ताव असेल, तेव्हा त्याला त्याच्यावरील आरोपांची माहिती दिली जाईल आणि त्या आरोपांच्या संदर्भात त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल.

(२) या नियमांनुसार नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या तरतुदींच्या अधीन असेलः

परंतु, उच्च न्यायालय हे या नियमांच्या प्रयोजनांसाठी न्यायिक सदस्यावर शिस्तविषयक व इतर नियंत्रण ठेवणारे प्राधिकरण असेल.

**१३. सदस्याचा राजीनामा.—** कोणताही न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य आपल्या स्वाक्षरीने राज्य शासनास लेखी नोटीस देऊन, कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकेलः

परंतु, जोपर्यंत राज्य शासनाकडून त्या सदस्याला लवकर पदभार सोडण्याची परवानगी दिली जात नाही, तोपर्यंत असा सदस्य, अशी नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत किंवा रीतसर नियुक्त केलेला उत्तराधिकारी आपले पद ग्रहण करेपर्यंत किंवा त्याच्या पदाचा कार्यकाळ संपेपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत, पदावर राहील.

**१४. नियुक्ती रद्द करणे.—** जर सेवानिवृत्त किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तींमधून नियुक्त केलेला न्यायिक किंवा प्रशासकीय सदस्य, संबंधित पदाच्या नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत रुजू झाला नाही तर, राज्य शासन, त्याची नियुक्ती रद्द करू शकेल आणि असे रिक्त पद भरण्यासाठी पावले उचलू शकेल.

**१५.** (१) न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्तींशी संबंधित असणाऱ्या बाबी, ज्यांच्याबाबत या नियमांमध्ये कोणतीही स्पष्ट तरतूद केलेली नाही, अशा बाबी निर्णयासाठी औद्योगिक न्यायाधिकरणाद्वारे राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविल्या जातील आणि त्यावर राज्य शासनाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(२) सेवानिवृत्त किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या न्यायिक सदस्याच्या किंवा प्रशासकीय सदस्याच्या सेवेच्या अटी व शर्तींच्या बाबतीत, ज्यांच्याबाबत या नियमांमध्ये कोणतीही स्पष्ट तरतूद केलेली नाही, अशा सेवेच्या अटी व शर्ती शासन वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील.

**१६. वकील म्हणून व्यवसाय करण्यावर निर्बंध.—** कोणत्याही न्यायिक किंवा प्रशासकीय सदस्यास, औद्योगिक न्यायाधिकरणाची सेवा बंद करण्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी, ज्या औद्योगिक न्यायाधिकरणात त्याने न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य म्हणून काम केले आहे, अशा कोणत्याही औद्योगिक न्यायाधिकरणात वकील म्हणून व्यवसाय करण्यास मनाई असेल.

**१७. बदलीबाबतची तरतूद.—** जर, कोणत्याही वेळी राज्य शासनाच्या मते तसे करणे आवश्यक असेल, तर शासन,—

(क) एका औद्योगिक न्यायाधिकरणात नियुक्त केलेल्या न्यायिक किंवा प्रशासकीय सदस्याची बदली दुसऱ्या औद्योगिक न्यायाधिकरणात करू शकेल; किंवा

(ख) कोणत्याही इतर औद्योगिक न्यायाधिकरणाच्या न्यायिक किंवा प्रशासकीय सदस्याचा अतिरिक्त कार्यभार, अनुक्रमे अशा न्यायिक किंवा प्रशासकीय सदस्याकडे सोपवू शकेल.

**१८.** राज्य शासनास, कोणत्याही वर्गातील किंवा प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत, लेखी कारणे नमूद करून यांपैकी कोणत्याही नियमांतील तरतूद शिथिल करण्याचा अधिकार असेल.

**नमुना-१**

(नियम १० पहा)

**राज्य औद्योगिक न्यायाधिकरणाचे न्यायिक सदस्य किंवा प्रशासकीय सदस्य यांच्यासाठी पदाच्या शपथेचा नमुना.**

मी, ................................, ................................ औद्योगिक न्यायाधिकरण (न्यायाधिकरणाचे नाव) चा न्यायिक सदस्य / प्रशासकीय सदस्य (जे लागू असेल त्यासमोर खूण करावी) म्हणून नियुक्त झाला असल्याने, गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो किंवा ईश्वरसाक्ष शपथ घेतो की, मी ................................ औद्योगिक न्यायाधिकरण (न्यायाधिकरणाचे नाव) चा न्यायिक सदस्य / प्रशासकीय सदस्य म्हणून माझी कर्तव्ये पूर्ण निष्ठेने आणि सदसद्विवेकबुद्धीने, माझ्या सर्व क्षमतेनिशी, ज्ञानानिशी आणि निर्णयानुसार, कोणाचीही भीती न बाळगता किंवा कोणाचीही मर्जी न राखता, तसेच कोणाबद्दलही स्नेह किंवा दुर्भावना न धरता पार पाडीन आणि मी संविधान व या देशाच्या कायद्यांचे जतन व संवर्धन करीन.

ठिकाण : (स्वाक्षरी)

दिनांक :

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रोशनी कदम-पाटील,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th May 2026.

*NOTIFICATION*

INDUSTRIAL RELATIONS CODE, 2020.

No.ITR 1224/C.R.135/Labour 6.— The following draft of the rules, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 44 read with sub-section (*1*) of section 99 of the Industrial Relations Code, 2020 (35 of 2020), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of the Maharashtra Judicial Officers of the Labour Courts and Industrial Courts (Recruitment, Appointment and Disciplinary Action) Rules, 2014, is hereby published as required by sub-section (*1*) of said section 99, for information of all persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft rules will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of 45 days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** Any objections or suggestions which may be received by the Commissioner of Labour, Maharashtra State, Kamgar Bhavan, C 20, E Block, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai-400 051 or on *email-mh.labourcodes.rules@gmail.com* from any person or organization with respect to the said draft rules, before the expiry of the aforesaid period, will be considered by the Government.

**3.** The objections and suggestions should be sent in the following proforma specifying,—

(*a*) the name and address of the person or organisation in column (i);

(*b*) the rule or sub-rule which is proposed to be modified in column (ii); and

(*c*) the revised rule or sub-rule proposed to be substituted and reasons thereof in column (iii).

*DRAFT RULES*

## CHAPTER-I

### Preliminary

**1.** These rules may be called the Maharashtra Industrial Tribunal Rules, 2026.

**2.** *Definitions.*— (*1*) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Code" means the Industrial Relations Code, 2020(35 of 2020);

(*b*) "District Judge" shall have the same meaning as provided in Article 236 of the Constitution of India;

(*c*) "electronically" means any information submitted by email or by uploading on the designated portal or payment made in any digital mode for the purpose of Code;

(*d*) "High Court" means the High Court of Judicature at Bombay;

(*e*) "section" means the section of the Code;

(*f*) "*Search-cum-Selection Committee*" means the *Search-cum-Selection Committee* constituted in accordance with rules 3;

(*g*) "State Government" means the Government of Maharashtra;

(*h*) "Tribunal" means the Industrial Tribunal constituted under the Code.

(*2*) The words and expressions used in these rules but not defined shall have the same meaning as assigned to them in the Code.

## CHAPTER-II

## Appointment of Members of Tribunal

**3.** *Appointment of Judicial Member of the Tribunal.*— (*1*) The Judicial Member shall be appointed by the Governor in consultation with the High Court on the recommendation of the Search-*cum*-Selection Committee.

(*2*) *Mode of appointment.*— Appointment to the post of Judicial Member shall be made by the following modes, namely :—

(*a*) by nomination, or

(*b*) by transfer

(*3*) *Appointment by nomination.*— A person shall be qualified for appointment as Judicial Member who,—

(*i*) has been a Judge of High Court of Judicature at Bombay; or

(*ii*) has been a District Judge or an Additional District Judge for a period not less than three years; or

(*iii*) has been a Civil Judge Senior Division having experience for a period not less than five years including as a Judge, Labour Court ;

(*iv*) has been, a Member of the Industrial Court constituted under the Industrial Dispute Act, 1947 (14 of 1947) for a period not less than five years;

(*v*) has been a Judge of Labour Court constituted under the Industrial Dispute Act, 1947 (14 of 1947) for a period not less than five years;

Provided that, no person shall be appointed as Judicial Member by nomination, unless he is declared medically fit by an authority specified by the State Government in this behalf.

(*4*) *Appointment by transfer*.— The appointment to the post of Judicial Member of the Industrial Tribunal shall be made by transfer of a Judge, Bombay High Court or a District Judge or an Additional District Judge or from the existing cadre of President or Member of the Industrial Court or a Judge, Labour Court.

**4.** *Appointment of Administrative Member of the Tribunal.*— (*1*) The appointment of the Administrative Member shall be made by the State Government by nomination on the recommendation of a Search-*cum*-Selection Committee.

(*2*) A person shall be qualified for appointment as an Administrative Member who,—

(*i*) has been a member of Indian Administrative Service to the Government of Maharashtra; or

(*ii*) is or has been, a Joint Secretary or Deputy Secretary or Under Secretary having service in the Government of Maharashtra for a period of not less than ten years, preferably having experience of handling labour matters or possesses a Diploma in Labour Laws or Degree in Law; or

(*iii*) is or has been, a Labour Commissioner in the Labour Department of Government of Maharashtra, having adequate experience of handling labour related matters; or

(*iv*) is or has been, an Additional or Deputy or Assistant Labour Commissioner in the Labour Department, Government of Maharashtra having experience of handling labour related matters for a period of not less than ten years; or

(*v*) is or has been, a Joint Director, Directorate of Industrial Safety and Health or Joint Director, Directorate of Steam Boiler for a period of not less than ten years.

(*3*) No person shall be appointed as Administrative Member unless he is declared medically fit by an authority specified by the State Government in this behalf.

**5.** *Search-cum-Selection Committee*.— (*1*) There shall be a Search-*cum*-Selection Committee (SCSC) for appointing the Members of the Industrial Tribunal, comprising of,—

(*a*) Chief Justice, Bombay High Court or a Judge, High Court or a retired Judge, High Court, nominated by him - Chairperson;

(*b*) Additional Chief Secretary or Principal Secretary or Secretary, Department of Labour, Government of Maharashtra - Member;

(*c*) Principal Secretary and RLA or Secretary, Law and Judiciary Department, Government of Maharashtra - Member;

(*d*) Commissioner of Labour, Department of Labour - Member-Secretary.

(*2*) The Search-*cum*-Selection Committee (SCSC) shall determine its procedure and shall recommend a panel of two or three persons as it deems fit for appointment to the post of Judicial or Administrative Member, as the case may be, taking into account qualifications, suitability, record of past performance, integrity as well as adjudicating experience of the persons eligible for the said post considering the requirement of Industrial Tribunal.

(*3*) No appointment of Member of the Tribunal shall be invalid merely by reason of a vacancy or absence of any member in the Search-*cum*-Selection Committee.

## CHAPTER-III

### Term of Office, Leave and Pay and Allowances to Members of Tribunal

**6.** *Term of Office*.— A person appointed as Judicial Member or an Administrative Member shall hold office for a term of four years from the date on which he enters upon the office or until he attains the age of sixty-five years, whichever is earlier.

**7.** *Casual vacancy*.— In case of a casual vacancy in the office of Judicial Member or an Administrative Member, the State Government shall appoint any Judicial Member or an Administrative Member of the other Industrial Tribunal to officiate as Judicial Member or an Administrative Member, respectively.

**8.** *Pay and allowances*.— (*a*) The Judicial Member or Administrative Member shall be entitled for pay and allowances as admissible to his parent cadre.

(*b*) *Pay and allowances to Superannuated Member*.— A Judicial Member or Administrative Member, appointed from retired or superannuated persons, shall be entitled for pay and allowances equivalent to his last pay drawn and other applicable allowances as per General Admininstration Department Government Resolution Dated 17.12.2016 or as may be determined by the Government from time to time.

**9.** *Leave*.— (*a*) The Judicial Member or Administrative Member shall be entitled for leave as may be admissible to his parent cadre.

(*b*) A Judicial Member or Administrative Member, appointed from retired or superannuated persons, shall be entitled for leave as may be admissible to an officer of the State Government holding Group A post carrying the same pay.

(*c*) The State Government shall be the leave sanctioning authority for the Administrative Member.

(*d*) The High Court shall be the leave sanctioning authority for the Judicial Member.

(*e*) The State Government shall be the sanctioning authority for foreign travel to the Judicial Member or Administrative Member.

## CHAPTER-IV

## Miscellaneous

**10.** *Oath of Office and Secrecy.*— Every person appointed as Judicial Member or Administrative Member shall, before entering upon his office, make and subscribe an oath of office and secrecy in the *Form-I* annexed to these rules.

**11.** *Conduct of Member of Tribunal.*— (*a*) If a written and verifiable complaint is received by the State Government against the Judicial Member or Administrative Member of the Tribunal alleging any definite charge of misbehavior or incapacity to perform the functions as Member, the Government shall make a preliminary scrutiny of such complaint.

(*b*) If on preliminary scrutiny, the State Government is of the opinion that there are reasonable grounds for making an inquiry into the truth of any misbehavior or incapacity of the concerned Member, it shall make a reference to the Search-*cum*-Selection Committee to conduct the inquiry.

(*c*) The Search-*cum*-Selection Committee shall complete the inquiry within six months' time or such further time as may be specified by the State Government.

(*d*) After conclusion of the inquiry, the Search-*cum*-Selection Committee shall submit its report to the State Government stating therein its findings and the reasons thereof on each of the charges separately with such observations on the whole case as it may think fit.

(*e*) The Search-*cum*-Selection Committee shall not be bound by the procedure laid down by the Code of Civil Procedure, 1908 (5 of 1908) but shall be guided by the principles of natural justice and shall have power to regulate its own procedure, including the fixing of date, place and time of its inquiry.

**12.** *Removal of Member.*— (*1*) The State Government shall, on the recommendation of Search-cum-Selection Committee, remove from office, any Judicial Member or Administrative Member, who,—

(*a*) has been adjudged as an insolvent; or

(*b*) has been convicted of an offence involving moral turpitude; or

(*c*) has become physically or mentally incapable of acting as such a Judicial Member or Administrative Member; or

(*d*) has acquired such financial or other interest as is likely to affect prejudicially his functions as a Judicial Member or an Administrative Member; or

(*e*) has so abused his position as to render his continuance in office prejudicial to the public interest.

Provided that, where a Judicial Member or Administrative Member is proposed to be removed on any ground specified in clauses (*a*) to (*e*), he shall be informed of the charges against him and shall be given an opportunity of being heard in respect of those charges.

(*2*) A person appointed under these rules shall be governed by the provisions of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979:

Provided that, the High Court shall be the authority and shall have disciplinary and other control over the Judicial Member for the purposes of these rules.

**13.** *Resignation of Member.*— A Judicial Member or Administrative Member may, resign his office at any time by giving notice to this effect in writing under his hand addressed to the State Government :

Provided that, the Member shall, unless he is permitted by the State Government to relinquish office sooner, continue to hold office until the expiry of three months from the date of receipt of such notice or until a person duly appointed as a successor enters upon his office or until the expiry of his term of the office, whichever is earlier.

**14.** *Cancellation of Appointment.*— If a Judicial or Administrative Member, appointed from retired or superannuated persons, do not join within a period of thirty days from the date of order of appointment of respective post, the State Government may cancel his appointment and may take steps to fill in such vacant post.

**15.** (*1*) The matter relating to the terms and conditions of services of the Judicial Member or Administrative Member with respect to which no express provisions has been made in these rules, shall be referred by the Industrial Tribunal to the State Government for its decision, and the decision of the State Government thereon shall be final and binding.

(*2*) The terms and conditions of service in case of retired or superannuated Judicial Member or Administrative Member with respect to which no express provisions has been made in these rules, shall be such as may be specified by the Government, by general or special order, from time to time.

**16.** *Restrictions on practicing as Advocate.*— A Judicial Member or Administrative Member shall be debarred for a period of two years from the date on which he ceases to be in service of Industrial Tribunal from practicing in any Industrial Tribunal in which he has worked as Judicial Member or Administrative Member of Industrial Tribunal.

**17.** *Provision for transfer*.— If, at any time in the opinion of the State Government it is necessary, it may,—

(*a*) transfer a Judicial or Administrative Member appointed in one Industrial Tribunal to another Industrial Tribunal; or

(*b*) give additional charge of a Judicial or Administrative Member of any other Industrial Tribunal to such Judicial or Administrative Member, respectively.

**18.** The State Government shall have power to relax the provision of any of these rules in respect of any class or categories of persons for the reasons to be recorded in writing.

**FORM- I**

(*See* Rule 10)

**Form of Oath of Office for Judicial Member or Administrative Member of the State Industrial Tribunal.**

I, --------------------------------------------------------, having been appointed as the Judicial Member/ Administrative Member (tick whichever is applicable) of the ------------------------------------ Industrial Tribunal (Name of the Tribunal) do solemnly affirm or do swear in the name of God that I will faithfully and conscientiously discharge my duties as the Judicial Member/Administrative Member of ------------------------------- Industrial Tribunal (Name of the Tribunal) to the best of my ability, knowledge and judgment, without fear or favour, affection or ill-will and that I will uphold the Constitution and the laws of the land.

Place : (Signature)

Date :

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ROSHANI KADAM-PATIL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.